
16-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/15/2025 10:55 PM Page 1




हादई वाचवणे हे सरकारचे ढोंग » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी रवाना

वेर्णा, रविवार, १६ फेब्रुवारी २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 164 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 16 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### केजरीवालांच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली, दि. १५ :** दिल्ली विधानसभा निवडणुकीत पराभवाचा धक्का बसणाल्यानंतर आता आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय निमंत्रक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. दिल्लीतील ६ फ्लॅग स्टाफ रोड येथील सरकारी बंगला शीशमहलचे नूतनीकरणासाठी झालेल्या खर्चाची सखोल चौकशी करण्याचे आदेश केंद्रीय दक्षता आयोगाने (सीव्हीसी) केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहेत. दिल्ली मुख्यमंत्री निवासस्थान शीशमहल हे ४०,००० चौरस यार्ड (८ एकर) पेक्षा जास्त जागेवर आहे. या बंगल्याच्या नूतनीकरणाचे आदेश केजरीवालांनी दिले होते. मात्र नूतनीकरण करताना बांधकाम नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार विजेंदर गुप्ता यांनी सीव्हीसीकडे दाखल केली होती.

---

### महाकुंभमध्ये पुन्हा अग्नितांडव

**प्रयागराज, दि. १५ :** महाकुंभमध्ये पुन्हा आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. सेक्टर १८ आणि १९ मधील तंबूंना ही आग लागली आहे. आगीची माहिती मिळताच अग्नीशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यास शर्थीचे प्रयत्न सुरू केले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र आगीत अनेक तंबू जळू खाक झाले आहेत. ही आग नेमकी कशी लागली, याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. दरम्यान, याआधीही ९ फेब्रुवारी (रविवार) रात्री महाकुंभमेळा परिसरातील अरैलच्या दिशेने असलेल्या सेक्टर २३ मध्ये आग लागली होती. याची माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ आग आटोक्यात आणली. गॅस सिलिंडरमुळे आग लागल्याचे सांगितले जात होते.

---

### एलओसीवर पुन्हा गोळीबार

**जम्मू, दि. १५ :** येथील अखनूर सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) शनिवारी पुन्हा गोळीबाराची घटना घडली. या गोळीबारात लष्कराचा एक जवान जखमी झाला. संबंधित जवान बटाल भागात गस्त घालत असताना सीमेपलीकडून गोळीबार झाला. जखमी जवानाला तत्काळ रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या गोळीबारात पाकिस्तानी लष्कराचा हात आहे की दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला, याचा तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या काही दिवसांपासून या भागात सातत्याने दहशतवादी हल्ले होत आहेत.

---

### व्हॉट्सअॅपचे नवे फिचर येणार

**नवी दिल्ली, दि. १५ :** व्हॉट्सअॅप हे इन्स्टंट मेसेजिंग अॅप जगभरात लोकप्रिय आहे. व्हॉट्सअॅपचे करोडो युजर्स आहेत. व्हॉट्सअॅप कंपनीही नवनवीन फीचर घेऊन येते. सध्या अशाच एका फीचरने लक्ष वेधून घेतलेय. हे फीचर भाषांतरासंदर्भात आहे. व्हॉट्सअॅपमधील भाषांतर (ट्रान्सलेशन) प्रक्रिया सुधारण्यावर काम सुरू आहे. नवे फिचर आपोआप भाषा ओळखेल आणि भाषांतर करेल.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# लवू मामलेदार यांचा मारहाणीनंतर मृत्यू

## मारहाण करणाऱ्या रिक्षाचालकाला अटक : फोंडा परिसरावर शोककळा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १५ :माजी आमदार आणि निवृत्त पोलिस उपअधीक्षक लवू मामलेदार यांना शनिवारी दुपारी बेळगावमधील एका रिक्षाचालकाने किरकोळ वादातून केलेल्या मारहाणीनंतर त्यांचा धक्कादायक मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण फोंडा परिसरावर शोककळा पसरली आहे. या प्रकरणी बेळगाव पोलिसांनी रिक्षा चालक मुजाहिद शकील जमादार वय २८ (रा. सुभाषनगर, बेळगाव) याला अटक केली आहे.**



बेळगावमधील खडेबाजार परिसरातल्या श्रीनिवास लॉजवर मामलेदार मुक्कामाला उतरले होते. श्रीनिवास लॉजजवळ दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ते आपल्या कारमधून जात होते. त्यावेळी गर्दीत त्यांची कार एका ऑटो रिक्षाला चाटून गेली. त्यावरून रिक्षाचालकाने मामलेदार यांना अडवून वादावादीला सुरुवात केली. या वादावादीतून रिक्षा चालकाने मामलेदार यांना प्रथम कानशिलात लगावून यांच्यावर हल्ला चढवला. रिक्षाचालकाने मामलेदार यांच्या कपाळावर आणि तोंडावर जोरदार प्रहार केले. तिथे बाजूला असलेल्या काही जणांनी ही मारहाण थांबवण्याचा प्रयत्न केला असल्याचे व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही फूटेजमध्ये दिसत आहे. त्यानंतर मामलेदार लॉजच्या पायऱ्या चढून वर येत असताना ते खाली कोसळले. लॉजच्या मॅनेजरने या घटनेची माहिती मार्केट पोलिसांना दिली. पोलिसांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, लवू मामलेदार यांना तातडीने बेळगावच्या जिल्हा रुग्णालयाकडे नेण्यात आले होते. त्या ठिकाणी त्यांची वैद्यकीय तपासणी केली असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याबाबतची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त रोहन जगदीश यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मारहाणीनंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला असावा असा कयास देखील व्यक्त केला जात आहे. मारहाणीच्या घटनेनंतर फरारी झालेला ऑटोरिक्षा चालक मुजाहिद याला पोलिसांनी अटक केली आहे. गोव्याच्या माजी आमदारावर झालेल्या या हल्ल्यानंतर बेळगावचे पोलिस प्रशासन एकदम जागे झाले. घटनास्थळी स्वत: डीसीपी रोहन जगदीश यांनी येऊन पाहणी केली तर पोलिस अधीक्षक भीमाशंकर गुळेद यांनीही जिल्हा रुग्णालयात दाखल होऊन घटनेची माहिती घेऊन वरिष्ठांना याची माहिती दिली.

२०१२ च्या विधानसभा निवडणुकीत लवू मामलेदार मगो पक्षाकडून निवडणूक लढवून फोंडा मतदारसंघातून विजयी झाले होते. तत्पूर्वी त्यांनी पोलिस सेवेतून पोलिस उपअधीक्षक पदावर कार्यरत असताना स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्यापूर्वी त्यांनी फोंड्यातील आल्मेडा हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणूनही काम केले होते. गोवा हस्तकला मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी काही काळ सांभाळले. २०१७ मध्ये मात्र त्यांना काँग्रेसच्या रवी नाईक यांच्याकडून प्रभाव पत्करावा लागला. त्यानंतरचा काही काळ त्यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये घालवला, पण तेथेही त्यांचे मतभेद झाल्याने पुन्हा काँग्रेसमध्ये परतले , २०२२ ची निवडणूक त्यांनी मडकई मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर लढवली. मात्र यामध्ये त्यांचा पराभव झाला. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा त्यांचा परिवार आहे.

# म्हादई वाचवणे हे सरकारचे ढोंग

## हायफाय दौऱ्यावर सामाजिक कार्यकर्त्यांची टीका

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १५ :** सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या म्हादई बाबतच्या खटल्याच्या सुनावणीकरीता विमानातुन बिझनेस क्लासने दिल्लीला प्रवास करणाऱ्या आणि पंचतारांकीत हॉटेलमध्ये मुक्काम करणाऱ्या सरकारच्या कायदेशीर आणि तांत्रिक पथकांच्या दौऱ्यावर म्हादई बचाव अभियानाने सडकुन टीका केली आहे. जोपर्यंत गोवा सरकार चांगल्या वरिष्ठ वकिलांना सामील करत नाही आणि म्हादईला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करत नाही तोपर्यंत म्हादईला वाचवता येणार नाही अशा प्रतिक्रीया अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केल्या आहेत.

याबाबत बोलताना 'म्हादई वाचवा गोवा वाचवा' अभियानाचे महेश म्हांबरे म्हणाले की ,

म्हादईच्या मुद्द्यावर, सरकार अजिबात गंभीर नाही. कारण जेव्हा डीपीआर आला आणि आम्ही १६ जानेवारी रोजी सांखळी येथे बैठक बोलावली होती, तेव्हा त्या वेळी एक डीपीआर आला होता आणि डीपीआरला विरोध करण्याची गरज होती. या सरकारने डीपीआरला विरोध केला नाही. सुधारित डीपीआरमध्ये त्यांनी गोव्यात येणारे सुर्ला गावही जोडले. कर्नाटकने लहान बंधारे जोडले. परंतु गोव्याने त्यालाही विरोध केला नाही. हे सरकार गंभीर नाही. आता त्यांनी प्रवाह स्थापन केले आहे ज्याची गरज नव्हती. म्हादई ही गोव्याची एकमेव जीवनरेखा असल्याने पाणी वळवता कामा नये.

सामाजिक कार्यकर्ते राजन घाटे यांनीही अशाच प्रकारच्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, गोवा सरकार फारसे गंभीर नाही हे आता स्पष्टच झाले आहे. पहिले म्हणजे म्हादई वाचवण्यासाठी व्याघ्र प्रकल्प बनवण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय आहे. जर असे केले तर कर्नाटक कधीही दारात पाऊल ठेवू शकणार नाही. ते कधीही पाणी वळवू शकणार नाहीत. दोन स्थानिक आमदार म्हणत आहेत की तिथे वाघ नाहीत. हे मला विनोदासारखे वाटते. ते सत्तरीमध्ये राहतात आणि वाघ पाहू शकत नाहीत हे अविश्वसनीय आहे. ते असे का करत आहेत? तुम्ही कर्नाटक सरकारला पाठिंबा देत आहात का? की तुम्हाला पश्चिम घाट संपवून ते काँक्रीटचे जंगल बनवायचे आहे? असा प्रश्न घाटे यांनी उपस्थित केला.

सर्फराज अंकलजी हे आणखी एक सामाजिक कार्यकर्ते याबाबतीत सरकारवर टीका करताना म्हणाले की, हे सरकार लोकांच्या हक्कांसाठी नाही. ते विकास आणि बांधकाम करून नफा कमवू इच्छितात. ते आपापल्या खात्यांसाठी कसे लढतात, विकास करतात आणि कमिशन कसे घेतात हे सर्वांना माहिती आहे. या सरकारला निवडणुका कशा लढायच्या हे माहित आहे. म्हादई त्यांच्या अजेंड्यावर नाही. लोकांना दररोज पाणी मिळते याची त्यांना पर्वा नाही. ते हर घर जल, हर घर नाल अशा मोठमोठ्या गोष्टी बोलतात. ते दावा करतात की त्यांनी सर्व काही दिले आहे, पण काहीही केले जात नाही. म्हादई हा हृदयाचा विषय आहे. म्हादई हा आपल्या अभिमानाचा विषय आहे, कारण देवाने ते आपल्याला दिले आहे. कर्नाटक पाणी थांबवू शकत नाही. कार्यकर्त्यांनी कळसा भांडुरा प्रकल्पाला भेट दिली आहे आणि आम्ही पाणी वळवण्याचे काम कसे होते ते पाहिले आहे. आम्ही ते सरकारला दाखवले होते. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी भेटही दिलेली नाही.

# पर्वरीतील वटवृक्षाच्या संरक्षणासाठी संयुक्त पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** पर्वरी येथील ऐतिहासिक वटवृक्षाच्या जतन आणि संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मंगळवार, १८ फेब्रुवारी रोजी संयुक्त पाहणी करण्यात येणार आहे. पुनर्रोपण केलेली पाचही झाडे मृत झाल्याने मौल्यवान वारसा वृक्षांचा ऱ्हास झाल्याबद्दल पर्यावरण कार्यकर्त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, या तपासणीसाठी वन विभागाचे अधिकारी, डॉक्टर ट्रीज'चे प्रतिनिधी, लँडस्केप डिझायनर आणि पर्यावरणीय सल्लागार पराग मोदी, सार्वजनिक बांधकाम विभाग , रस्ते कंत्राटदार आणि याचिकाकर्ते आरोन व्हिक्टर ई. फर्नांडिससहभागी होणार आहेत. या तपासणीचा अ हवाल २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयात सादर केला जाणार आहे.

पर्वरी येथील 'वोडाकडे' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जवळपास २०० वर्षे जुना असलेल्या या वटवृक्षाच्या स्थलांतराच्या निर्णयाला खापरेश्वर मंदिर समिती आणि पर्यावरणवाद्यांनी जोरदार विरोध केला आहे.

पर्यावरण कार्यकर्ते अव्हर्टिनो मिरांडा यांच्या मते, राज्य सरकारकडे जुनाट आणि प्रचंड वृक्षांचे पुनर्रोपण किंवा स्थलांतर करण्यासाठी आवश्यक कौशल्य नाही. त्यामुळे अनेक मौल्यवान वारसा वृक्ष नष्ट होण्याच्या संकटात आहेत.

स्थानांतरित केलेली पाचही झाडे जवळपास पूर्णपणे सुकून गेली आहेत आणि त्यांचे जगण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. यामध्ये सांत इनेज येथून कंपाल मैदानात पुनर्रोपण केलेला वटवृक्ष, हरमल, शिवोली आणि कळंगुट येथे पुनर्रोपण केलेली झाडे यांचा समावेश आहे. या झाडांची स्थिती अत्यंत खराब असून, पुनर्रोपण यशस्वी झाले नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. हैदराबादमधील डॉक्टर ट्रीज' या एजन्सीने पर्वरीतील एका वटवृक्षासह पाच झाडांचे स्थलांतर केले होते. मात्र, या प्रक्रियेत अनेक त्रुटी असल्याने यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. याचिकाकर्ते आरोन व्हिक्टर ई. फर्नांडिस यांनी न्यायालयात सादर केलेल्या अहवालात लँडस्केप डिझायनर आणि पर्यावरणीय सल्लागार पराग मोदी यांनी पुनर्रोपणाच्या स्थितीबाबत गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत.

पराग मोदी यांनी त्यांच्या अहवालात वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणीय पुनर्संचयनाचा अनुभव असलेल्या तज्ज्ञांना पुढील वृक्ष स्थलांतर प्रक्रियेत सहभागी करण्याचे सुचवले आहे. यामुळे भविष्यात वारसा वृक्षांचे नुकसान टाळता येईल, असे मत पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. यावर अंतिम निर्णय २० फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीनंतर होणार आहे.

### नावेलीत धडकेत दुचाकीस्वार ठार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१५ :** नावेली येथे शनिवारी कारची धडक बसून दुचाकीस्वार ठार झाला. फिलीप परेरा (४६ वर्षे, मांडोप, नावेली) हा स्थानिक इसम ठार झाला. मडगाव पोलिसांनी कारचालक रोहन रिबेलो (१९ वर्षे) या युवकार गुन्हा दाखल केला आहे. अपघातात सापडलेली दोन्ही वाहनेही जप्त केली आहेत.

यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, फिलीप हे आपल्या स्कूटरवरून नावेलीच्या दिशेने जात होते. स्कूटरच्या मागे कार जात होती, त्यावेळी कारची धडक स्कूटरस्वाराला बसली. त्यात स्कूटरचालक परेरा गंभीर जखमी झाले. तातडीने मडगावातील दक्षिण गोवा जिल्हा इस्पितळात नेण्यात आले असता, डॉक्टरांनी त्यांना मृतावस्थेत आणल्याचे घोषित केले. मृतदेह इस्पितळात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आल्याची माहिती मडगाव शहर पोलिसांनी दिली. कारचालक रोहन रिबेलो याच्यावर गुन्हा नोंदवून पुढील प्रक्रिया करण्यात आली आहे.

दरम्यान, अपघातानंतर संध्याकाळी स्थानिक व मयताचे नातेवाईक, जवळच्यांनी मडगाव शहर पोलिस स्थानकात जमून कार चालकाला अटक करण्याची मागणी केली. प्रतिमा कुतिन्हो ही त्यात सहभागी झाल्या होत्या.



# गोव्याच्या मंत्री, आमदारांची त्रिवेणी संगमावर 'डुबकी'

■ टीम दैनिक हेराल्ड

**दाबोळी, दि. १५ :** गोव्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि अन्य राजकीय नेत्यांनी आपल्या कुटुंबासहित महाकुंभमेळ्यात हजेरी लावत त्रिवेणी संगमात डुबकी मारली. प्रयागराज येथील त्रिवेणी संगमावर स्नान करण्यासाठी गोवा सरकारचे राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री , आमदार आणि अन्य राजकीय नेत्यांच्या कुटुंबकबिल्यासह १५० जणांचा ताफा एअर इंडियाच्या विशेष विमानाने शनिवारी सकाळी दहा वाजता दाबोळी विमानतळावरून प्रयागराजकडे झेपावला. सरकारने आमच्यासाठी उपलब्ध केलेली ही संधी म्हणजे आमचं जन्मजन्मांतरीचं भाग्यच आहे अशा प्रतिक्रिया यावेळी या दौऱ्यात सहभागी झालेल्या मंत्री, आमदारांनी व्यक्त केल्या.

प्रयागराजमधील प्रचंड गर्दी आणि वाहतूक कोंडी यामुळे मौनी अमावस्येला रद्द झालेला गोव्याच्या मंत्री, आमदारांचा सहकुटुंब महाकुंभ दौरा शनिवारी सकाळी दहा वाजता दाबोळी विमानतळावरून सुरू झाला. एअर इंडियाच्या विशेष विमानाने जवळपास १५० जण प्रयागराज मधल्या त्रिवेणी संगमात डुबकी मारण्यासाठी रवाना झाले. राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई तसेच राज्याचे मुख्यमंत्री डॉ. सावंत आणि भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्यासह अनेक नेते आपल्या कुटुंबसहीत या दौऱ्यात सहभागी झाले . त्यांच्यासोबत वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो, वास्कोचे आमदार दाजी साळकर, मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर, मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट, भाजपा नेते नरेंद्र सावईकर आणि अन्य नेते प्रयागराजला रवाना झाले.

आतापर्यंत गोव्यातील हजारो जणांना सरकारने ३ विशेष रेल्वे गाड्यांनी महाकुंभमध्ये सहभागी होण्याची संधी दिली असून आणखीही एक विशेष ट्रेन महाकुंभसाठी लवकरच रवाना

पान २ ▶

# अमेरिकेत मोठी नोकरशाही कपात ; ट्रम्प–मस्क यांची आक्रमक मोहीम

वॉशिंग्टन, (रॉयटर्स), दि. १५ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उद्योजक एलन मस्क यांनी नोकरशाहीत मोठी कपात करण्याची मोहीम हाती घेतली असून, विविध सरकारी विभागांतील ९,५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना नोकरीवरून कमी करण्यात आले आहे. जमिनींचे व्यवस्थापन, लष्करी माजी सैनिकांचे कल्याण, ऊर्जा, कृषी आणि आरोग्य विभागांवर या निर्णयाचा मोठा प्रभाव पडला आहे.

काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये विशेषतः पहिल्या वर्षातील प्रोबेशनरी कर्मचारी आहेत, जे तुलनेने कमी संरक्षणाधीन होते. याशिवाय, स्वेच्छा निवृत्ती योजनेंतर्गत ७५ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांनी नोकऱ्या सोडल्या असून, ही एकूण संघीय कर्मचाऱ्यांच्या सुमारे ३% कपात मानली जात आहे. व्हाईट हाऊसच्या माहितीनुसार, ट्रम्प यांना सरकारच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण आणायचे आहे. सध्या अमेरिकेवर ३६ ट्रिलियन डॉलरचे कर्ज आहे आणि गेल्या वर्षी १.८ ट्रिलियन डॉलरची तूट नोंदवली गेली होती.

काँग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाचा बहुमत असल्यामुळे ही मोहीम सहज राबवली जात असली, तरी डेमोक्रॅट्सनी याला तीव्र विरोध केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, ट्रम्प यांचा हा निर्णय सरकारवरील संसदेच्या अधिकारावर गदा आणणारा आहे. दरम्यान, मस्क



यांच्या जलद आणि आक्रमक निर्णयप्रक्रियेमुळे व्हाईट हाऊसच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. व्हाईट हाऊसच्या चीफ ऑफ स्टाफ सुसी वाइल्स यांनी समन्वयाच्या अभावाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. संघ राज्य एजन्सीमधील मोठ्या प्रमाणावरील कर्मचारी कपातीमुळे विविध सेवा ठप्प होण्याची शक्यता आहे. रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्र तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील जवळपास ५०% प्रोबेशनरी कर्मचाऱ्यांना काढण्यात आले आहे.

राष्ट्रीय उद्यान सेवा आणि अमेरिकन वन सेवेलाही मोठा फटका बसला आहे. परिणामी, अलीकडेच वणव्याने ग्रस्त असलेल्या लॉस एंजेलिसमध्ये हंगामी अग्निशमन कर्मचाऱ्यांची भरती थांबवली गेली आहे. आंतरराष्ट्रीय विकास संस्थांसह ग्राहक वित्तीय संरक्षण विभाग यासारख्या सरकारी संस्था जवळपास पूर्णतः बंद करण्याचा मस्क आणि ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. यामुळे अनेक सरकारी कर्मचारी नाराज झाले आहेत. लष्करात सेवा दिलेले आणि संरक्षण विभागात १७ वर्षे कार्यरत असलेले निक गियोया यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. मी देशासाठी सेवा केली, पण आता मला देशानेच दगा दिला, असे त्यांनी म्हटले आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युनियनने या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. काही न्यायालयांनी काही सरकारी कपातींना तात्पुरती स्थगिती दिली आहे. ऊर्जा विभागातील अणु सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी कपात अंशतः मागे घेण्यात आली आहे. संघीय कामगारांच्या अधिकारांवर गदा आणणाऱ्या या निर्णयावर तीन न्यायालयांत सुनावणी सुरू आहे. न्यूयॉर्कच्या एका न्यायालयाने ट्रेझरी डिपार्टमेंटच्या महत्त्वाच्या आर्थिक डेटाबेसमध्ये मस्क यांच्या टीमला प्रवेश नाकारला आहे. सरकारी यंत्रणा कार्यक्षम बनवण्याच्या नावाखाली घेतल्या गेलेल्या या आक्रमक निर्णयांमुळे अमेरिकेतील राजकीय वातावरण तापले असून, पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.